मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पुणे-पिंपरी-चिंचवड वाहतूक कोंडीमुक्तीसाठी आता ‘ॲक्शन प्लॅन’

## मंत्री दादा भुसे यांची विधिमंडळ सभागृहात ग्वाही; आमदार राहुल कुल, आमदार महेश लांडगे यांची लक्षवेधी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील वाहतूक कोंडीच्या समस्येबाबत विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन संपण्यापूर्वी आढावा बैठक घेण्यात येईल. त्यामध्ये महानगरपालिका, एमआयडीसी, पीएमआरडीए, राष्ट्रीय महामार्ग अशा संबंधित अधिकाऱ्यांना ‘कालबद्ध’ कार्यक्रम आखून देण्यात येईल. भूसंपादनाचा प्रमुख अडथळा असल्यामुळे मुख्यमंत्री- उपमुख्यमंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य सरकार सकारात्मक भूमिका घेईल. पुणे रिंगरोड, नाशिक फाटा ते खेड एलिव्हेटेड कॉरिडॉर यासारख्या प्रमुख प्रकल्पांचे काम निर्धारित वेळेत पूर्ण करण्यासाठी ‘ॲक्शन प्लॅन’ तयार केला जाईल, असे आश्वासन कॅबिनेट मंत्री दादा भुसे यांनी दिले.



विधानसभा पावसाळी अधिवेशन मुंबई येथे सुरू आहे. त्यापार्श्वभूमीवर पुणे रिंगरोडचे काम रखडले असून, त्याला गती मिळावी. यासह शहराच्या सभोवताली व अंतर्गत रस्त्यांवर होणारी वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी प्राधान्याने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी दौंडचे आमदार राहुल कुल आणि आमदार महेश लांडगे यांनी लक्षवेधीद्वारे केली.

आमदार राहुल कुल म्हणाले की, पुण्यातील वाहतूक कोंडीमुळे सर्वसामान्य नागरिकांना मन:स्ताप होतो आहे. शहराच्या अंतर्गत रस्त्यांवरील वाहतूक कोंडी आणि शहराला जोडणारे रस्ते आणि त्यावरील वाहतूक समस्या असे दोन वेगळे विषय आहेत. महायुती सरकारने हडपसर ते यवत आणि पुणे ते शिरुर आणि पुणे रिंगरोडच्या कामाला मंजुरी दिली. सदर मार्ग ४ वर्षांत पूर्ण करण्यात येणार आहेत. असे असले तरी निश्चित कालावधीमध्ये प्रकल्प पूर्ण होण्यासाठी समन्वय यंत्रणा तयार करावी. प्रत्येक महिन्याला बैठक घेवून प्रकल्पाची प्रगतीबाबत लोकप्रतिनिधींना अवगत करावे. रस्त्यांची दुरावस्था, अतिक्रमण आणि स्मार्ट सिटीमुळे रस्त्यांची रुंदी कमी झाली आणि फूटपाथ स्मार्ट झाले. त्यामुळे पुणे आणि परिसरातील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात.

आमदार महेश लांडगे म्हणाले की, हिंजवडी आयटी हब, ऑटो हब, पुणे विमानतळ अशा महत्त्वाच्या ठिकाणांच्या मध्यावर असलेले पुणे-पिंपरी-चिंचवड शहर मोठ्याप्रमाणात विस्तारीत होत आहे. वाहतूक समस्या मोठ्या प्रमाणात आहे. नागरिकांमध्ये नाराजी आहे. पिंपरी-चिंचवडमध्ये पुढील वर्षभरात १ लाखाहून अधिक वाहने रस्त्यावर येणार आहेत. तळेगाव- शिक्रापूर, वाघोली-शिरुर, हडपसर- दौंड या रस्त्याचे काम सुरू होते आहे. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सरकारचे आभार आहेत. पण, पुणे रिंग रोड, पुणे-नाशिक महामार्गावरील नाशिक फाटा ते खेड या एलिव्हेटेड कॉरिडॉरचे काम भूसंपादनाअभावी रखडले आहे. तसेच, पुणे-बेंगलोर महामार्ग आणि हिंजवडी आयटी हब कोंडीमुक्त करण्यासाठी रस्त्यांच्या प्रस्तावित कामांना गती देण्याची आवश्यकता आहे.

### अधिकारी- लोकप्रतिनिधी बैठक घ्या...

» पुणे-नाशिक महामार्गासाठी भूसंपादन करण्यासाठी पिंपरी-चिंचवड महानगरपलिका, पीएमआरडीए सोबत राज्य सरकारने निधी उभारावा. हिंजवडी आयटी हबची जगभरात ओळख आहे. पण, काही दिवसांपूर्वी पावसामुळे रस्ते कॅनॉल झाले. रस्त्यांची कामे निश्चित वेळेत पूर्ण होत नाहीत. कारण, भूसंपादनासाठी शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळत नाही. चांगला परतावा दिल्यास शेतकरी जागा देतील. भूसंपादनासाठी अडचणी येत आहेत, तर जिल्हाधिकारी प्रशासनाने ‘इंटीग्रेटेड ऑथॉरिटी’ तयार करावी. २०३० पर्यंत “महाराष्ट्र फाईव्ह ट्रिलियन इकॉनॉमी” असा संकल्प मुख्यमंत्री फडणवीस यांनी केला आहे. त्यामध्ये पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहराचे योगदान राहणार आहे. पण, त्यासाठी लागणाऱ्या मूलभूत सोयी-सुविधांमधील प्रमुख सेवा रस्ते आहेत. त्यामुळे रस्ते ट्रॅफिकमुक्त झाले पाहिजेत. यावर उपाययोजना करण्यासाठी पुणे जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी आणि संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांची बैठक घ्यावी, अशी मागणी आमदार लांडगे यांनी केली.

# दफणभूमी आरक्षण रद्द करा चिखलीकरांची मागणी

## फ क्षेत्रिय कार्यालय यथे बैठक : समस्थ टाळगांव चिखली ग्रामस्थ यावेळी उपस्थित

**पिंपरी | प्रतिनिधी**

गावठाण परिसरात दत्तमंदीर बाजूला दफणभूमी आरक्षण असून, ते त्वरीत रद्द करून, क्रीडांगण विकसित करावे अशी मागणी चिखली ग्रामस्थांनी केली आहे. याबाबत बुधवारी (दि.९) रोजी फ क्षेत्रिय कार्यालय यथे बैठक पार पडली. यावेळी समस्थ टाळगांव चिखली ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते.

यापूर्वी गावठांण परिसरात सर्वधर्मियांसाठीच्या दफणभूमीचे आरक्षण टाकण्यात आले होते. ते रद्द करून, पुन्हा ख्रिश्चन धर्मियांसाठी दफणभूमी आऱक्षण करण्यात आले. मात्र या ठिकाणी कुठलीही दफणभूमी नको, तर मुलांसाठी क्रिडांगण विकसित करावे, टाळंगाव चिखली ही संतभूमी आहे, वारकऱ्यांना वारी दरम्यान आश्रयासाठी जागा उपलब्ध व्हावी अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

फ क्षेत्रिय कार्यालय झालेल्या बैठकीमध्ये फ क्षेत्रिय अधिकारी अतुल पाटील, कार्यकारी अभियंता विजय



वायकर, चिखली पोलिस ठाण्याचे वरीष्ठ पोलिस निरीक्षक विठ्ठल साळुंके तसेच फ क्षेत्रिय कार्यायलाचे सर्व अधिकारी यांच्यासह, समस्थ टाळंगाव चिखली ग्रामस्थ, वारकरी-टाळकरी यावेळी उपस्थित होते.

> “ कुठल्याही जाती-धर्माला आपला विरोध नाही. मात्र या ठिकाणी कुठलीही दफणभूमी न होता, मुलांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी, क्रिडांगण, आषाढी वारी दरम्यान येणाऱ्या वारकऱ्यांना एक आश्रयस्थान असावे यासाठी सोय करावी अशी मागणी आहे.
>
> **- कुंदन गायकवाड, माजी नगरसेवक.**

> “ चिखली परिसरात एक ही क्रिडांगण नाही, त्यामुळे खेळाडू विद्यार्थ्यांची गैरसोय होते. या मुलांच्या भविष्यासाठी खेळाला महत्त्व देऊन या दफणभूमी आऱक्षणाच्या ठिकाणी क्रिडांगण व्हावे अशी आमची मागणी आहे.
>
> **- जितेंद्र यादव, चिखली ग्रामस्थ.**

# जिल्ह्यातील पर्यटन स्थळांची माहिती एका ॲपवर

## सर्व पर्यटन स्थळे एका ॲपवर आणण्याचा जिल्हा प्रशासनाचा निर्णय



### या ॲपवर काय काय माहिती मिळणार

- पर्यटनस्थळे कुठे आहेत.
- तेथे जाण्यासाठी काय आणि कोणत्या सुविधा आहेत.
- पर्यटनस्थळाच्या परिसरात कोणकोणत्या सुविधा आहेत.
- पर्यटनस्थळाच्या ठिकाणी किती शुल्क आकारणी.
- शुल्क ऑनलाइन भरण्याची सुविधा.
- कोणकोणते स्लॉट आहेत.

> पर्यटनस्थळांवर एकाचवेळी पर्यटकांची गर्दी उसळू नये, तेथे येणाऱ्या पर्यटकांना सर्व सोई-सुविधा उपलब्ध व्हाव्यात, ही स्थळे कुठे आहेत, त्यासाठी कनेटीव्हीटी काय उपलब्ध आहे, अशा सर्व गोष्टींची माहिती पर्यटकांना एकाच ठिकाणी मिळावी, यासाठी ॲप विकसित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पर्यटन विकास आराखड्यात या सर्व गोष्टींचा समावेश करण्यात आला आहे.
> - जितेंद्र डुडी, जिल्हाधिकारी. पुणे.

**पुणे | प्रतिनिधी**

विकेंड किंवा अन्य सुट्टीच्या दिवशी पुणे आणि जिल्ह्यात पर्यटनासाठी येणा-या पर्यटकांची मोठी संख्या लक्षात घेत जिल्हा प्रशासनाने पुढाकार घेत सर्व पर्यटन स्थळे एका ॲपवर आणण्याचा निर्णय घेतला आहे. पुणे शहरासह जिल्हयात किती पर्यटन स्थळे आहेत, ती कुठे आहेत, तेथे जाण्यासाठीच्या मार्गाबरोबरच कोठून आणि काय वाहन व्यवस्था आहे या माहितीबरोबरच तेथे जाण्यासाठीचा स्लॉट कोणते आहेत आणि पर्यटनस्थळावर प्रवेशासाठी किती शुल्क भरावे लागणार आहे, यांची इत्थंभूत माहिती लवकरच या ॲपवर मिळणार आहे.

मावळ तालुकयातील कुंडमळा येथील पुलावर पर्यटकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी झाल्याने दुर्घटना घडली. यामध्ये काही पर्यटकांना जीव गमवावा लागला होता. यापूर्वी अशा अनेक घटना पुणे जिल्हयात असलेल्या पर्यटनस्थळांवर घडल्या आहेत. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने पर्यटनस्थळांवर सोई-सुविधा वाढविण्यांबरोबरच शुल्क आकारणे अशा विविध उपयोजना करण्यासाठी पर्यटन विकास आराखडा तयार केला आहेत. त्यामध्ये पर्यटकांच्या सोईसाठी ॲप विकसित करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याबाबतची माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली.

पुणे जिल्हामध्ये निसर्गसंपन्न आहे. या जिल्हयात गड-किल्ले, धरणे, टेकड्या, गवताळ प्रदेश, लेणी, ऐतिहासिक वारसास्थळे असे पर्यटनाची अनेक ठिकाणे आहेत. तसेच या पर्यटनस्थळांना जोडणारी कनेटिव्हीटी देखील आहे. त्यामुळे राज्यातील पर्यटकांबरोबरच परराज्य आणि परदेशातून पर्यटनासाठी या जिल्हयात येणाऱ्यांची मोठी संख्या आहे.

मात्र ही ठिकाणे कुठे आहेत, तेथे जाण्यासाठी वाहन व्यवस्था कशी आणि कोणत्या स्वरूपाची आहे, ती सुविधा कोणत्या ठिकाणाहून आहे. त्या ठिकाणी निवास आणि खाण्यापिण्याची काय सुविधा आहेत, यांची एकत्रित माहिती पर्यटकांना उपलब्ध होत नाही. अनेकदा त्यांची फसवणूक झाल्याचे प्रकारही उघडकीस आले आहेत.

पुणे जिल्ह्यातील १३८ पर्यटन स्थळे आहेत. त्या सर्व ठिकाणांची माहिती, त्यांची वैशिष्ट, त्या ठिकाणी असलेल्या स्पोर्ट्स सुविधांसह सर्व माहिती देणारे ॲप विकसित करण्यात येणार आहे. त्यासाठीची प्रक्रिया जिल्हा प्रशासनाकडून सुरू करण्यात आली आहे. येत्या काही दिवसांत त्याबाबतची निविदा प्रक्रिया पूर्ण होईल आणि जानेवारी महिन्यापर्यंत ही सर्व माहिती ॲपवर असेल, असे डुडी यांनी सांगितले.

# आता व्हॉट्स ॲपवर मिळणार पे ॲण्ड पार्कची माहिती

## पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे आता व्हॉट्सॲपवरून पार्किंग बुकिंग




### कशी करणार नोंदणी?

- महापालिकेने ८६२४९२५९३४ हा क्रमांक प्रसिद्ध केला आहे. त्यावर 'हाय' असा संदेश पाठविल्यानंतर आगाऊ नोंदणी करण्यासाठी कोणती प्रक्रिया करायची याची माहिती येते. तसेच पैसे भरण्यासाठी स्कॅनरही येतो. ही नोंदणी वापरकर्त्यांच्या नावाने निश्चित वेळेसाठी ठेवली जाणार आहे. वाहन वेळेत पार्क न केल्यास वापरकर्त्याला तत्काळ सूचना पाठवली जाते. ती जागा पुढील नागरिकासाठी खुली केली जाते. शहरातील दहा ठिकाणी ही सुविधा कार्यान्वित झाली आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिकांना आता वाहनतळावर 'पार्किंग'ची पावती फाडण्यासाठी थांबावे लागणार नाही. महापालिकेने सशुल्क पार्किंग (पे ॲण्ड पार्क) उपक्रमांतर्गत नागरिकांना सुलभ पद्धतीने वाहनतळाची नोंदणी करण्यासाठी 'व्हॉट्सॲप पार्किंग' डिजिटल सेवा सुरु केली आहे. या व्हॉट्सॲप क्रमाकांवरुन वाहनतळाची नोंदणी करता येणार आहे. त्यामुळे नागरिकांचा वेळ वाचणार आहे.

पिंपरी-चिंचवड शहराच्या लोकसंख्येबरोबरच वाहनांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. सद्यस्थितीत शहराची लोकसंख्या ३० लाखांच्या जवळपास असून वाहनांची संख्या २५ लाख आहे. गेल्या तीन वर्षात साडेपाच लाख वाहनांची भर पडली आहे. त्यामुळे वाहतुकीची मोठी समस्या निर्माण होत आहे. महापालिका प्रशासनाने वाहतूक नियंत्रण, इंधन बचत, सार्वजनिक वाहतुकीचा सुयोग्य वापर आणि त्यामुळे होणारे वैयक्तिक फायदे यांसाठी सशुल्क पार्किंग (पे ॲण्ड पार्क) धोरण नव्याने राबविले आहे. शहरातील दहा ठिकाणी सशुल्क पार्किंगची अंमलबजावणी केली जात आहे.

त्यामध्ये निगडीतील कै. मधुकर पवळे उड्डाणपूल, भक्ती-शक्ती, नाशिक फाटा, एम्पायर इस्टेट उड्डाणपूल, चिंचवडगावातील चापेकर चौक, पिंपळेसौदागर येथील लिनिअर गार्डनच्या शेजारील अर्बन स्ट्रीट येथे, स्पॉट १८ सनशाइन व्हिलाज, गणेशयम सोसायटी येथील तीन ठिकाणी याची अंमलबजावणी सुरु आहे. येथे वाहन उभे करण्यासाठी तासाप्रमाणे शुल्क आकारले जाते. त्याची दररोज पावती फाडावी लागते. त्यात नागरिकांचा वेळ जातो. त्यामुळे महापालाकिने 'व्हॉट्सॲप पार्किंग' डिजिटल सेवा सुरु केली आहे.

दुचाकीसाठी एका तासाला पाच रुपये, चारचाकीला दहा रुपये, रिक्षा, टेम्पोला १५ रुपये, बससाठी एका तासाला ५० रुपये असे शुल्क आकारले जाते. एखाद्या नागरिकाला दिवसभरासाठी दुचाकी पार्क करावी लागते. त्यामुळे मासिक पास देण्याचे नियोजन सुरु आहे. पासधारकांना २० ते ३० टक्के सवलत देण्यात येणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

डिजिटल सेवेमुळे कागदपत्रे किंवा तिकिटाची गरज पडणार नाही. प्रत्यक्ष माहिती आणि आरक्षण स्थिती 'व्हॉट्सॲप'वर मिळणार आहे. त्यामुळे पार्किंग प्रक्रियेत सुसूत्रता आणि वेळेचा अपव्यय टळणार आहे. नागरिकांचा वेळ वाचणार आहे. शहरातील वाहतूक व्यवस्थेतही सुधारणा होईल, असा दावा पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या दळणवळण विभागाचे सह शहर अभियंता बापूसाहेब गायकवाड यांनी केला.

# आपत्कालीन यंत्रणेने दक्ष राहावे, आयुक्त शेखर सिंह यांचे निर्देश

## पवना व मुळशी धरणात पाण्याची आवक वाढली असल्याने या धरणातून पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहर परिसरात तसेच धरण क्षेत्रात संततधार पाऊस सुरू आहे. पवना व मुळशी धरणात पाण्याची आवक वाढली असल्याने या धरणातून पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे. त्यामुळे शहरातून वाहणाऱ्या पवना आणि मुळा नदीच्या पाणी पातळीत वाढ होत आहे. या पार्श्वभूमीवर महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी आपत्कालीन यंत्रणेला दक्ष राहण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच नदीकाठी राहणाऱ्या नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन देखील आयुक्त सिंह यांनी केले आहे.

शहर परिसरात तसेच धरण क्षेत्रात संततधार पाऊस सुरू आहे. पवना व मुळशी धरणात पाण्याची आवक वाढली असल्याने या धरणातून पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला आहे.पवना धरणातून पवना नदीपात्रात २ हजार ८०० क्युसेक्स विसर्ग सुरू आहे. तर दुपारी २ वाजल्यापासून मुळशी धरणातून मुळा नदी पात्रात ८ हजार २०० क्युसेक्स वेगाने पाण्याचा विसर्ग सुरू आहे. हवामान विभागाने पुढील काही तास धरण क्षेत्र आणि घाटमाथ्यावर पाऊस होण्याचा इशारा दिला असल्याने धरणातून होणाऱ्या विसर्गात वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पवना आणि मुळा नदीकाठच्या सखल भागातील नागरिकांनी सतर्क राहावे. नदीपात्राजवळ कोणीही जाऊ नये, असेही आवाहन करण्यात येत आहे.




### महापालिकेची यंत्रणा सज्ज

» एडिस इजिप्ती हा डास साचलेल्या स्वच्छ पाण्यात अंडी घालतो, व त्यातून डासांची उत्पत्ती होते. कुलर, फ्रिज, कुंड्या, फुलदाणी, प्लास्टिकच्या टाकाऊ वस्तू, नारळाच्या करवंट्या, काचेच्या फुटक्या बाटल्या आदी भंगार साहित्यात पाणी साचले तर त्यामध्ये या डासांची उत्पत्ती होते. उघड्या पाण्याच्या टाक्या, जुने टायर, उघडे हौद, उघडे सेफ्टीक टँक, रस्त्यावर खड्डयात साचलेले पावसाचे पाणी, सांडपाणी येथेही या डासांची उत्पत्ती होते.

### मदतीसाठी इथे करा संपर्क

- आग्निशामक विभाग महत्त्वाचे दूरध्वनी क्रमांक
- पिंपरी मुख्य अग्निशमन केंद्र - ९९२२५०१४७५
- भोसरी अग्निशमन केंद्र – ९९२२५०१४७६
- प्राधिकरण अग्निशमन केंद्र - ९९२२५०१४७७
- चिखली अग्निशमन केंद्र – ८६६९६९४१०१
- थेरगाव अग्निशमन केंद्र – ७०३०९०७९९९
- रहाटणी अग्निशमन केंद्र – ९९२२५०१४७८
- मोशी अग्निशमन केंद्र – ७२६४९४३३३३
- तळवडे अग्निशमन केंद्र - ९५५२५२३१०१

### पूर नियंत्रण कक्ष व इतर महत्त्वाचे दुरध्वनी क्रमांक

- मध्यवर्ती पूरनियंत्रण कक्ष – ०२० २८३३११११ / ०२० ६७३३११११
- अ क्षेत्रिय कार्यालय - ०२० ६८३३४०५०
- ब क्षेत्रिय कार्यालय – ०२० ६८३३४३००
- क क्षेत्रिय कार्यालय – ०२० ६८३३४५००७
- ड क्षेत्रिय कार्यालय – ०२० ६८३३४७००
- इ क्षेत्रिय कार्यालय – ०२० ६८३३५०००
- फ क्षेत्रिय कार्यालय – ०२० ६८३३५३००
- ग क्षेत्रिय कार्यालय – ०२० ६८३३५५००
- ह क्षेत्रिय कार्यालय – ०२० ६८३३५७००

# पोस्ट ऑफिस मोशीचे; मात्र पिनकोड आळंदीचा; तीन वर्षांनंतरही मोशीकरांना मिळेना तत्परसेवा

## पिनकोड कार्यान्वित करण्यास केंद्राकडून होतोय विलंब, नवीन पिनकोड कार्यान्वित नसल्याने विद्यार्थ्यांना, नागरिकांना अडचणी येत आहेत

**पिंपरी | प्रतिनिधी**

तीन वर्षांपूर्वी मोशीकरांसाठी नवीन पोस्ट कार्यालय आणि नवीन पिनकोड सुरू करण्यात आला. मात्र, तीन वर्षांनंतरही नवीन पिनकोड कार्यान्वित नसल्याने विद्यार्थ्यांना, नागरिकांना अडचणी येत आहेत. त्यामुळे परिसरातील नागरिक, पालक यांच्यामध्ये नाराजी निर्माण झाली आहे.

वीस वर्षांच्या प्रतीक्षेनंतर मोशीकरांना नवीन पोस्ट ऑफिस आणि पिनकोड (411070) मिळाला. मात्र, पिनकोड कार्यान्वित नसल्यामुळे मोशीकरांना पुन्हा अडचणी येत आहेत. पिनकोड कार्यान्वित नसल्यामुळे महाविद्यालयीन मुला-मुलींना प्रवेशप्रक्रियेसाठी अडचणी येत आहेत. ऑनलाईन खरेदी-विक्री करताना नवीन पिनकोड येत नाही.

ऑनलाईन खरेदी केल्यानंतर जुना पिनकोड वापरावा लागतो. त्यामुळे वस्तू आळंदी पोस्ट ऑफिसला जाऊन मोशीला येते. त्यामध्ये बराच वेळ जातो. एलआयसी पॉलिसी, हेल्थ पॉलिसी आणि इतर पॉलिसी यांच्याकडे हा पिनकोड अस्तित्वात नाही, असे दाखविले जाते. त्यामुळे आळंदीचा जुनाच पिनकोड वापरावा लागत आहे.

नागरिकांना जुनाच पिनकोड वापरावा लागत आहे. त्यामुळे तीन वर्षांपासून सुरू केलेल्या पिनकोडचा काहीच उपयोग होत नाही. नागरिकांना अडचणी येत आहेत. तीन वर्षांपूर्वी मोशीकरांसाठी नवीन पोस्ट कार्यालय आणि नवीन पिनकोड सुरू करण्यात आला.




मात्र, तीन वर्षांनंतरही नवीन पिनकोड कार्यान्वित नसल्याने विद्यार्थ्यांना, नागरिकांना अडचणी येत आहेत. त्यामुळे परिसरातील नागरिक, पालक यांच्यामध्ये नाराजी निर्माण झाली आहे. ऑनलाईन खरेदी केल्यानंतर जुना पिनकोड वापरावा लागतो. त्यामुळे वस्तू आळंदी पोस्ट ऑफिसला जाऊन मोशीला येते. त्यामध्ये बराच वेळ जातो. एलआयसी पॉलिसी, हेल्थ पॉलिसी आणि इतर पॉलिसी यांच्याकडे हा पिनकोड अस्तित्वात नाही, असे दाखविले जाते.

> **नवीन पोस्ट ऑफिस, पिनकोड दिला मात्र कार्यान्वित नसल्याने जुनाच पिनकोड आळंदी पोस्ट ऑफिसचा वापरावा लागतो. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना ॲडमिशन घेताना, पॉलिसीच्या ठिकाणी नवीन पिनकोड अस्तित्वात नसल्याचे सांगितले जाते. नाईलाजाने जुना पिनकोड वापरावा लागतो.**
>
> **- संतोष बोराटे, सामाजिक कार्यकर्ते.**

> **पिनकोड कार्यान्वित करण्यासाठी केंद्र सरकारच्या हातात असते. पोस्ट ऑफिसमध्ये आम्ही फक्त शासनाकडून आलेल्या सुविधा देण्याचे काम करतो. नवीन पिन अजूनही कार्यान्वित नसल्याने तक्रारी येत आहेत.**
>
> **- सारिका नलावडे, पोस्ट ऑफिस**

# बारामतीच्या केळी उत्पादकांना बुस्टर डोस

## पावणेतीन लाखांचे अनुदान मिळणार : लागवड, प्रक्रियेत मदत

**पुणे | प्रतिनिधी**

तालुक्यातील शेतकऱ्यांना एकसुरी ऊस पिकाला पर्याय म्हणून केळी लागवडीसाठी प्रोत्साहन देण्यासाठी कृषी विभाग-आत्मा अंतर्गत विशेष समूह विकास कार्यक्रम राबविला जाणार आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत हेक्टरी दोन लाख ८९ हजार रुपये अनुदान उपलब्ध करून देण्याची तरतूद आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना केळी लागवड आणि मूल्यवर्धन प्रक्रियेसाठी पायाभूत सुविधा निर्माण करण्यास मदत होणार आहे.

बारामती तालुक्यातील ५९ हजार ३९२ हेक्टर बागायती क्षेत्र असून, यापैकी २४ हजार ०७०.५० हेक्टर क्षेत्रावर ऊस लागवड आहे. पिकांचा समावेश आहे. मात्र, वर्षानुवर्षे सतत ऊस लागवडीमुळे जमिनीची सुपीकता, सेंद्रिय कर्ब कमी होत आहे. पाण्याचा अतिवापर आणि खतांचा अमर्यादित वापर यामुळे जमिनीचा पोत खराब होत आहे. उसाची सरासरी उत्पादकता कमी होत आहे.



### या उपाययोजना..

- उती संवर्धनाद्वारे रोप निर्मितीसाठी नवीन कृषी पदवीधरांना प्रयोगशाळा उभारणीसाठी अनुदान.
- तिसऱ्या वर्षाची अनुदानाची रक्कम पहिल्या दोन वर्षांत विभागून देणे.
- मार्चअखेरपर्यंत लागवडीस परवानगी.
- पॅकिंग, ट्रेडिंग, वाहतूक आणि शीतगृहासाठी शेतकरी गटांना अनुदान.

केळी लागवड हा ऊस पिकाला पर्याय ठरू शकतो. केळी पिकाला कमी पाणी लागते, ठिबक सिंचन आणि मल्चिंग पेपरचा वापर केल्याने पाणी आणि खतांचा नियंत्रित वापर शक्य होतो. यामुळे जमिनीचा पोत सुधारतो आणि क्षारपड जमिनीचे व्यवस्थापन होण्यास मदत होते. केळी पिकाची १२ ते १५ महिन्यांत दोनदा तोडणी होते, आणि प्रतिएकर ३० ते ५० टन उत्पादन मिळते. निर्यातक्षम केळीस सरासरी १०,००० रुपये प्रतिटन बाजारभावाने केळी पिकातून कमी कालावधीत अधिक नफा मिळवता येतो

सामूहिक विकास कार्यक्रमाची कार्यपद्धती कृषी विभागाने शेतकऱ्यांमध्ये जनजागृती, अर्ज स्वीकारणे आणि निवड प्रक्रिया पूर्ण करण्याचे नियोजन. रोहयो योजनेसाठी अंदाजपत्रके तयार करून तांत्रिक आणि प्रशासकीय मंजुरी.माती नमुने तपासणी, जमीन तयारी आणि लागवड तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण.लागवडीनंतर ते काढणीपर्यंतच्या प्रत्येक टप्प्यावर तज्ज्ञांमार्फत प्रशिक्षण. काढणीपश्चात व्यवस्थापनासाठी पॅक हाऊस, कोल्ड स्टोरेज तयार करणे. तालुक्यातील शेतकऱ्यांना एकसुरी ऊस पिकाला पर्याय म्हणून केळी लागवडीसाठी प्रोत्साहन देण्यासाठी कृषी विभाग-आत्मा अंतर्गत विशेष समूह विकास कार्यक्रम राबविला जाणार आहे.

### योजनेतील प्रमुख तरतुदी

- अनुदान : मग्रारोहयो अंतर्गत हेक्टरी २,८९,००० रुपये अनुदान.
- ठिबक सिंचन : ८० टक्के अनुदान.
- प्रशिक्षण : लागवड ते काढणी आणि निर्यातक्षम उत्पादनासाठी तज्ज्ञांचे मार्गदर्शन.
- पायाभूत सुविधा : पॅक हाऊस, कोल्ड स्टोरेजसाठी अनुदान.
- संरक्षक उपाय : वादळापासून संरक्षणासाठी संरक्षक पिकांचा पट्टा आणि बॅगिंग तंत्रज्ञान.

> “केळी लागवडीमुळे शेतकऱ्यांना आर्थिक फायदा तर होईलच, शिवाय जमिनीची सुपिकता वाढून पुढील पिकाच्या उत्पादनातही वाढ होईल. इच्छुक शेतकऱ्यांनी नजीकच्या कृषी विभाग कार्यालयाशी संपर्क साधावा.
>
> - सचिन हाके, तालुका कृषी अधिकारी, बारामती.

# एमआयडीसीला जोडणाऱ्या रस्त्यांची दुरवस्था

## सरकारला हजारो कोटींचा महसूल देणारी एमआयडीसी, पण सुविधांमध्ये शून्य प्रगती!

**पुणे | प्रतिनिधी**

चाकण औद्योगिक वसाहतीचा (एमआयडीसी) पाचवा टप्पा सध्या महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासासाठी एक महत्त्वाचा घटक ठरला असला, तरी या टप्प्याला जोडणारे रस्ते अक्षरशः खड्ड्यांनी भरलेले असून, ते मृत्यूचे सापळे बनले आहेत. दररोज हजारो वाहने या मार्गाने उद्योगात ये-जा करतात; परंतु अपुऱ्या देखभालीमुळे रस्त्यांची अवस्था अतिशय खराब झाली आहे.

रस्त्यांवरील खड्डे, फुटलेली नाल्यांची झाकणं, आणि रस्त्यांच्या कडेला साचलेला कचरा – ही दृश्यं चाकण चखऊउ परिसरात नेहमीची झाली आहेत. स्थानिक उद्योजक, कामगार आणि वाहनचालक यांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. अनेक वेळा या समस्यांकडे लक्ष वेधूनही प्रशासनाने याची दखल घेतलेली नाही.

खेड तालुक्यातील चाकण, कुरुळी, वासुली, आंबेठाण, सावरदारी या भागांतील औद्योगिक वसाहतींमधून दरवर्षी शासनाला मोठया प्रमाणात महसूल मिळतो. यात जीएसटी, उत्पादन शुल्क, वीजवापर शुल्क आणि इतर सेवांवरील करांचा समावेश आहे. जर या पैकी केवळ 2 टक्के रक्कम देखील एमआयडीसी क्षेत्राच्या रस्ते, ड्रेनेज, स्ट्रीटलाइट्स, वाहतूक नियोजन यावर खर्च केली, तर चाकण एमआयडीसी हा जपान किंवा जर्मनीसारख्या औद्योगिक शहरांना टक्कर देईल.

अनेक उद्योजकांनी रस्त्यांची ही दुरवस्था पाहून नवीन गुंतवणुकीपासून माघार घेतली आहे. हा प्रकार केवळ स्थानिक विकासालाच अडथळा ठरत नाही, तर महाराष्ट्राच्या औद्योगिक प्रतिमेलाही धक्का देतो. स्थानिक नागरिकांचा आणि कामगारांचा संतप्त प्रश्न आहे एमआयडीसीइतका महसूल कमावते, मग तो वापरला कुठे जातो? प्रशासनाने तात्काळ दखल घ्यावी आणि रस्ते, पायाभूत सुविधा यावर तातडीने निधी खर्च करावा, हीच मागणी आहे. चाकण औद्योगिक वसाहतीचा (एमआयडीसी) पाचवा टप्पा सध्या महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासासाठी एक महत्त्वाचा घटक ठरला असला, तरी या टप्प्याला जोडणारे रस्ते अक्षरशः खड्ड्यांनी भरलेले असून, ते मृत्यूचे सापळे बनले आहेत.



### उद्योजक नाराज – गुंतवणुकीला धोका!

- दररोज हजारो वाहने या मार्गाने उद्योगात ये-जा करतात; परंतु अपुऱ्या देखभालीमुळे रस्त्यांची अवस्था अतिशय खराब झाली आहे. स्थानिक उद्योजक, कामगार आणि वाहनचालक यांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. अनेक उद्योजकांनी रस्त्यांची ही दुरवस्था पाहून नवीन गुंतवणुकीपासून माघार घेतली आहे. हा प्रकार केवळ स्थानिक विकासालाच अडथळा ठरत नाही, तर महाराष्ट्राच्या औद्योगिक प्रतिमेलाही धक्का देतो. स्थानिक नागरिकांचा आणि कामगारांचा संतप्त प्रश्न आहे एमआयडीसीइतका महसूल कमावते, मग तो वापरला कुठे जातो? प्रशासनाने तात्काळ दखल घ्यावी आणि रस्ते, पायाभूत सुविधा यावर तातडीने निधी खर्च करावा, हीच मागणी आहे.